प्रदक्षिणा

लेखक: संकल्प चौधरी

पुस्तकाचे नाव : प्रदक्षिणा.

प्रकार : ट्रेक प्रवास वर्णन.

लेखक : संकल्प चौधरी (sanky.f1@gmail.com)

छायाचित्रे : संकल्प चौधरी.

नकाशा सौजन्य : trekshitiz.com.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान.

प्रकाशन दिनांक : छत्रपती शिवाजी महाराज जयंती (तिथीनुसार),

फाल्गुन कृष्ण तृतीया, शके १९३६ ,

०८ मार्च २०१५

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई-पुस्तक वेबसाइटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर अथवा भाषांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

अर्पणपत्रिका

माझ्या भटकंतीच्या वेडाला जपणाऱ्या आणि मला

सदैव प्रोत्साहन देणाऱ्या प्रिय आई आणि दादा यांस

हे पुस्तक सादर अर्पण...

संकल्प चौधरी

रायगड



महादरवाजा
पालखी दरवाजा
नाना दरवाजा
मेणा दरवाजा
वाघ दरवाजा
गंगासागर तलाव
हत्ती तलाव
कुशावर्त तलाव
महादेव मंदिर
बाजारपेठ
होळीचा माळ
सिंहासन
नगारखाना
हिरकणीचा बुरूज
तलाव
TreKshitiZ.com

पूर्वार्ध:

माझ्या ऑफिसच्या ग्रंथालयात विपुल प्रमाणात ग्रंथसंपदा उपलब्ध आहे. असच एके दिवशी पुस्तके चाळत असताना नजर गो.नि.दां. च्या " दुर्गदर्शन " या पुस्तकावर गेली.

शे-दोनशे पानांचे ते छोटेखानी पुस्तक म्हणजे अप्पांच्या विविध भटकंती मोहिमांच्या वर्णनांचा खजिनाच जणू... !!

प्रसिद्ध अशी "दहा दिवस दहा दुर्ग" मोहिम, कर्नाळा, रायगड, रसाळ-सुमार-महिपत, हरिश्चंद्रगड, राजमाची, प्रदक्षिणा इ. अनेक रमणीय भटकंत्यांच्या आठवणी यात दिल्या आहेत.

पुस्तक घेऊन घरी आलो आणि एक एक प्रकरण वाचून काढू लागलो. अप्पांची भाषा म्हणजे एकदम मनाला भुरळ घालणारी, वाचणाऱ्याला एकदम आपणच त्याठिकाणी फिरतोय की काय !! असं वाटायला लागत.

वाचता वाचता रायगड प्रदक्षिणेचे सदर सुरू केले. चहूबाजूंनी गड न्याहाळताना टकमक टोक, लिंगाणा, भवानीकडा, वाघोलीची खिंड, वाघ दरवाजा असे उलगडून दाखवलेले गडाचे विविध पैलू तसेच सभोवतालच्या घनदाट जंगलाचे सुरेख वर्णन वाचून प्रदक्षिणा करायची माझी ओढ अजूनच तीव्र झाली.

शिवज्याभिषेकाचा दिवस पण जवळ येत होता, त्यानिमित्त प्रदक्षिणा करण्याचं डोक्यात घोळतच होतं आणि या पुस्तक प्रकरणामुळे मनातल्या ठिणगीचा भडकाच उडाला.

मग काय विचारता, एकदा ठरल्यावर मग मित्रपरिवारातील टाळकी गोळा करण्याचा उद्योग सुरू झाला. सुरवातीला जमलेले ५ जण, परंतु ट्रेकचा दिवस जवळ येईपर्यंत त्यातील मी आणि प्रदीप असे दोघेच जणं उरलो.

या सगळ्याचा परिणाम म्हणजे मी ट्रेक रद्द करण्याच्या बेतात होतो, आदल्या दिवशी प्रदीपला फोन करून तशी कल्पना पण मी दिली होती परंतु त्याने फोनवर दाखवलेल्या उत्साहामुळे मी तो बेत रद्द केला.

परंतु हा उत्साह किती अल्पायुषी ठरणार आहे याची मला तेव्हा बिलकुल कल्पना नव्हती........!!!!!

दिनांक १ जून २०१४

रात्री ठरल्याप्रमाणे प्रदीपला दादर स्टेशन बाहेर भेटलो आणि ९:३० वाजताची चिपळूणला जाणारी २x२ पकडून आम्ही महाडला निघालो.

गाडीत बसल्यावर आमच्या गप्पा-टप्पा सुरू झाल्या. प्रदीप त्याने केलेल्या अनेक ट्रेक्सचे किस्से / वर्णनं मला ऐकवत होता. वाटेत बरंच ट्रॅफिक असल्याने आम्हाला पनवेलला पोहोचायलाच बऱ्यापैकी वेळ लागला परंतु त्यापुढे ड्रायवर दादांनी गाडी जोरात हाणल्यामुळे आम्ही सुमारे ३:३० वाजता महाडला पोहोचलो.

सांडोशीला जाणारी गाडी अजून फलाटाला लागली नव्हती त्यामुळे प्रतीक्षा करण्यावाचून गत्यंतर नव्हते. महाडला पोहोचेपर्यंत झोप तशी लागलीच नव्हती त्यामुळे बसल्या जागी पेंग येत होती. इतक्यात गाडी आली आणि आम्ही दुर्गदुर्गेश्वराची वाट कापू लागलो.

पहाटेचे साधारण ४:०० वाजत होते परंतु झोप अनावर झाल्याने दोघांना कधी डोळा लागला समजलेच नाही. परिणामस्वरूप पाचाडला उतरण्याऐवजी आम्ही जिजाऊ समाधीच्या पण पुढे एखाद किलोमीटर वर उतरलो. **(नशीब मधेच जाग आली नाहीतर बिनदिक्कत सांडोशीला पोहोचलो असतो...!!)**

पहाटेचे ४:४५ वाजलेले, आजूबाजूला मिट्ट काळोख (डोळे सरावले नसल्याने) , वाहत्या वाऱ्यामुळे जाणवणारा हवेतला किंचित गारवा अशा वातावरणात आम्ही रायगडापासून सुमारे ४ किमी अंतरावर उभे होतो.

बॅगेतून टॉर्च बाहेर काढला आणि चालायला सुरवात केली. २-४ पावल जात नाही तो रस्त्याच्या बाजूला **"नजर हटी, दुर्घटना घटी"** हा राज्य सरकारचा मौलिक संदेश दृष्टीपथास पडला आणि आमच्या जखमेवर अजूनच मीठ चोळल्यासारख झालं. स्वत:वरच चडफडत आम्ही भरभर पावलं उचलू लागलो.

आम्ही साधारण अर्धा किलोमीटर चाललो असू तो माझ्यासाठी धोक्याची घंटा वाजली!! सोबत आलेला प्रदीप सारखा धापा टाकायला लागला, ते पाहून माझे धाबेच दणाणले. दिवसभरात काय घडणार आहे याची जणू पूर्वसूचनाच होती ती....

मजल दरमजल करत आम्ही जिजाऊ साहेबांची समाधी पार केली. एकुलत्या एका टॉर्चच्या झोतात वाडा दिसतोय का ? याचा निष्फळ प्रयत्न करून पहिला. एकूणच अतिशय संथ गतीने आम्ही रायगडाकडे वाटचाल करत होतो.

साधारण ७:०० वाजण्याच्या सुमारास आमची पायगाडी चित दरवाज्याजवळ येऊन पोहोचली. तिकडे पोहोचलो आणि नजरेसमोरचे दृष्य पाहून अक्षरश: दिग्मूढ झालो. नभोपटलावर उलगडणारी मोहक सकाळ पाहून पाय जागच्याजागी खिळले गेले.

नकळत हात कॅमेऱ्याकडे वळले आणि सूर्यनारायणाने चितारलेल ते सुंदर चित्र आम्ही आमच्या कॅमेऱ्यात कैद करून घेतलं.

यानंतर आम्ही आमचा मोर्चा वळवला तिथून जवळच असणाऱ्या वाघबीळाकडे!!!



वाघाबीळाची वैशिष्ट्यपूर्ण रचना

वाघाबीळाच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे येथून आपण पाचाड आणि छत्री निजामपूर / रायगड वाडी या दोन्ही बाजूस नजर ठेवू शकतो.

© Sankalp Chaudhari

यानंतर सुरूवात झाली दुर्गदुर्गेश्वराच्या प्रदक्षिणेची, झाडांच्या सावलीमुळे आणि वाहत्या वाऱ्यामुळे किंचित गारवा अजून जाणवत होता.

थोडयाच वेळात आम्ही डांबरी रस्ता सोडून पायवाटेला लागलो. वाट व्यवस्थित मळलेली असून सोबत दिशादर्शक बाणही काढलेले आहेत. महाराजांच्या काळापासून हिरकणवाडीत राहणाऱ्या अवकीरकर कुटुंबातील १४ व्या पिढीतील भटक्यांचे सुपरिचित श्री. रेवा भाऊ दर वर्षी या मार्गावर एकट्याने MARKING चे काम

वाटेवरील दिशादर्शक बाण

थोडयाच वेळात आम्ही खाली असणाऱ्या रायगडवाडी मध्ये येऊन पोहोचलो. प्रदीपच्या थकव्यामुळे श्री. रमेश ढवळे यांच्याकडे जरा वेळ विसावलो. वाडी तशी छोटीशीच... १०-१५ घरांची वस्ती, सभोवताली शेतं पसरलेली आणि त्यात भाताच्या पेंढया ठेवण्यासाठी वासे गाडलेले, असं एकंदर तिचं स्वरूप!!!

तिथून पुढे आल्यावर दूरवर टकमक टोकाचे दर्शन झाले. हिरकणीचा खळगा पार करून आम्ही मशीद मोर्चा खाली पोहोचलो.

तिथून कोसळणारा कडा पाहून "दीड गाव उंच ताशीव कडा" हे महाराजांनी केलेले वर्णन किती यथार्थ होते याची प्रचिती आली.

एव्हाना सकाळचा गारवा घामाच्या धारांमद्धे परिवर्तित झाला होता. उन्हानी डोकं वर काढायला सुरवात केली होती, जसजसं ऊन वर येत होतं तसं प्रदीपचे पाच मिनिटांचे ब्रेक वाढत होते.

बर्फाळ प्रदेशात राहणाऱ्याला सहारा वाळवंटात आणून सोडल्यावर जी अवस्था होईल तशी अवस्था प्रदीपची झाल्यासारखी वाटत होतं. एकूणच परिस्थिति पाहून मला राहून राहून एकच प्रश्न पडत होतं की “ प्रदीपने याआधी केलेली पन्हाळा-विशाळगड भटकंती मोहीम कशी केली असेल ?? ”

आता पर्यंत आम्ही काटेकुटे तुडवत महादरवाजाच्या खाली येऊन पोहोचलो होतो, इथून टकमक, खानूचा डिग्गा, वारंगीचा डोंगर आणि दूरवर कोकणदिवा व कावळया खिंड नजरेस येत होते.

© Sankalp Chaudha

© Sankalp Chaudhari

© Sankalp Chaudhari

गडाच्या पायथ्याखालील जंगलात करवंद, आंबा, फणस आणि इतर बरीच फळझाडे आहेत. प्रदीपने ट्रेकचा एकूणच गृहपाठ चांगला केला असल्याने मिळणारी फळं घेऊन जाण्यासाठी मोठी पिशवी आणली होती, परंतु अजून मनासारखा **फळलाभ** प्रदीपला होत नव्हता.

" सब्र का फल मीठा होता है " असं म्हणतात, पण इथे प्रदीपचा संयम पणाला लागलेला आणि इतक्यात आम्हाला ते दिसलं......



जॅकफ्रूट चा जॅकपॉट

एका मोठया फणसाच्या झाडाला शेकड्यांनी फणस लगडले होते. **जॅकफ्रूटचा जॅकपॉट लागल्याचे भाव प्रदीपच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होते.** प्रदीप साठी एक बऱ्यापैकी फणस मी झाडावरून उतरवला पण त्यानी आग्रह करून माझ्यासाठीपण एक फणस घ्यायला लावला.

काढलेले फणस पिशवीत ठेवतोय तोपर्यंत प्रदीपनी घोषणा केली की वयोमानामुळे पिशवी उचलू शकत नाही त्यामुळे केवळ नाईलाजस्तव मला ते फणस उचलावे लागले.

वाढतं ऊन, खांद्यावर बॅग आणि आता हातात आलेल हे साधारण २०-२५ किलोच वजन यामुळे आमचा आधीच हळू असलेला वेग अजूनच मंदावला.

शेवटी आम्ही आळीपाळीनी ते फणस उचलू लागलो आणि थकून भागून आम्ही एकदाचे रायनाक समाधीपाशी पोहोचलो. दर्शन घेऊन तिथेच थोडा वेळ आराम केला आणि पुढे निघालो.

Chaudhari

रायगड प्रदक्षिणा
← रायनाक स्मारक →

समाधी पार करून आम्ही टकमक टोकाला वळसा घालून पुढे निघालो. आभाळात बाणासारखं घुसलेलं टकमक टोक चहूबाजूंनी न्याहाळण्याचा अनुभव अतिशय विलक्षण होता. मनोमन भवानीकडा, टकमक आदी मार्ग “VIRGIN CLIMB” करणाऱ्या सर्वश्री हिरा पंडित यांचे स्मरण केले.

वाटेतील टकमक पायथ्याची पाटी.

© Sankalp Chaudhari

टकमक पायथ्यापासून करवंदीचं गच्च रान सुरू होतं. त्यात मधून मधून आंब्याची झाडंसुद्धा आम्हास खुणावत होती. जाळीतला तो टपोरा रानमेवा पाहून आमच्या तोंडाला पाणी सुटायला लागलं.

परिणामी फणसाचं ओझं वाटेतच सोडून आम्ही झाडीत घुसलो आणि अंगावर उमटणाऱ्या ओरखडयांची पर्वा न करता हात - तोंड चिकाने बरबटेपर्यन्त मनसोक्त करवंद हादडली.

टपोरा रानमेवा.

करवंदांची मेजवानी आटोपून आम्ही पुढे निघालो. पोट बऱ्यापैकी भरल्यामुळे आम्ही झपझप पावलं उचलू लागलो परंतु प्रदीपचा थकव्यामुळे आम्ही म्हणावं तितक्या वेगाने वाट कापू शकत नव्हतो.

तितक्यात शिकारी कुत्र्यांचं भुंकणे ऐकू आले आणि सोबतच दोन घरं दृष्टिपथास पडली. प्रदक्षिणेच्या वाटेवर या आडरानात घरं कुठून आली याचच मला कुतूहल वाटायला लागलं. प्रदक्षिणेच्या वाटेवर लागणारी ही शेवटची मानवी वस्ती, यानंतर प्रदक्षिणा संपेपर्यंत घनदाट जंगल !!!!!

शिवकाळात ज्याचा राजकीय कैदी ठेवण्यासाठी वापर केला जायचा अश्या बेलाग आणि दुर्गम लिंगाण्याचे इथून फार सुरेख दर्शन होते.

© Sankalp Chaudhari

लिंगाणा दर्शन करून आम्ही निवडुंगाच्या खळग्याच्या दिशेने निघालो. सोबतीला घेतलेले फणस आता आमचा अंत पाहत होते, परिणामस्वरूप मी प्रदीपला निर्वाणीचा इशारा दिला की **“ मी आता हे फणस यापुढे उचलणार नाही, तुला फणस घरी न्यायचा असेल तर उरलेला रस्ता तूच ते उचल !! ” .**

हा सूचक इशारा मिळाल्यानंतर प्रदीपने देखील जास्त मोह न बाळगता होकार दिला आणि अशा प्रकारे इतकी मेहनत करून उचलून आणलेले ते फणस आम्ही वाटेत सोडून दिले.

एव्हाना साधारण दुपारचा १ वाजत होता. आम्ही सातविणीचा खळगा पार करून वाघोली खिंडीच्या दिशेने निघालो होतो, परंतु घनदाट जंगल आणि खिंडीचा तीव्र चढ आम्हाला जेरीस आणत होता. प्रदीप तर आता अक्षरशः ४-५ पावलांनातर बसायला लागला होता. प्रदीपच्या थकव्यामुळे आम्हाला जंगलातच रात्र होईल अस वाटायला लागला होतं.

© Sankalp Chaudhari

Sankalp Chaudhari

रायगड प्रदक्षिणा
←निवडुंगाचा खळगा→



घड्याळात २ वाजत आले होते , वाघोली खिंडीत येऊन आम्ही पोचलो होतो, परंतु प्रदीप जो तिथे बसून पडला तो तिथून हलायच नाव घेत नव्हता शेवटी मी हळू हळू पुढे निघालो तसं महाराजांची गाडी हलली.

आता पुढे उतार असल्याने मी भरभर चालत होतो, खिंडीखाली झाडी जरा विरळ असल्याने ऊन अजूनच टोचत होतं, म्हणून मी वेग वाढवून वाघ दरवाज्याखाली जाऊन बसलो. जवळ असलेल्या पाण्याचा शेवटचा घोट घशाखाली उतरवला, यापुढे पाणी पण संपलेल त्यामुळे लवकरात लवकर हिरकणवाडी गाठण क्रमप्राप्त होतं.

वाघ दरवाज्याखाली बसून मी प्रदीपची वाट बघत होतो. वाटेवरील सुस्पष्ट बाणांमुळे दिशा चुकण्याचा फारसा संभव वाटत नव्हता परंतु १५ – २० मिनिटं झाली तरी प्रदीपचा काही पत्ता नाही म्हटल्यावर माझ्या डोक्यात शंकेची पाल चुकचुकली.

प्रदीपला आवाज देत मी बाराटाकीच्या खळग्यापर्यन्त जाऊन आलो पण याचा कुठे काहीच पत्ता नाही, आवाजाला पण प्रतिसाद येत नव्हता. १५-२० मिनिटं शोधण्याचा निष्फळ प्रयत्न करून मी तडक धावतच हिरकणवाडी कडे निघालो. उन्हामुळे जीव नकोसा झालेला पण तशाही परिस्थितीत पाय दामटवत एकदाचा काळकाई खिंड पार करून हिरकणवाडीत पोहोचलो.

लागलीच रोप-वे च्या तिकीट खिडकीवर जाऊन रेवा भाऊंची चौकशी केली , ते येईपर्यंत जेवण आटोपून घेतले. रेवा भाऊ आल्यावर त्यांना सगळा घडलेला किस्सा सांगितला ते पण माणुसकीची जाण ठेवत हातातली शेतीची काम बाजूला सोडून लगेच माझ्यासोबत यायला तयार झाले.

बॅग तिकडेच ठेऊन फक्त पाणी व टॉर्च घेऊन मी आणि रेवा भाऊ साधारण ४:३० च्या सुमारास काळकाई खिंडीच्या दिशेने निघालो.

वाटेत जाता जाता रेवा भाऊ चौकशी करत होते आणि त्यांची नेहमीची पठडीतली शीळ घालत होते.

“ वाघ वगेरे कोणत्याही जनावरला आम्ही भीत नाही फक्त पायाखाली सरपटणाऱ्या प्राण्यांना घाबरतो, त्यामुळे जे काही करायचय ते अंधार पडायच्या आत.......... अंधार पडल्यावर मी जंगलात पाऊल पण टाकणार नाही ” रेवा भाऊ मला सूचनावजा दम भरत होते.

“ ज्याअर्थी तुझा मित्र वाघ दरवाज्याला आला नाही त्याअर्थी तो सरळ खाली गेला असणार, आपण एक काम करू... वाघोली पर्यंत जाऊन येऊ. माझ्या मते तो त्याच दिशेने गेला असेल” रेवा भाऊ त्यांचा ६ तपांचा अनुभव लावून मला संगत होते.

आमचं शोधसत्र सुरू होऊन साधारण अर्धा तास झाला असेल तेवढ्यात आम्हाला रेवा भाऊ देत असलेल्या विशिष्ट प्रकारच्या

शिळेला दिलेला प्रतिसाद ऐकू आला. आम्ही तडक आवाजाच्या दिशेने निघालो, जंगलातून काळकाई खिंडीच्या इकडून बाहेर निघून आम्ही वाघोलीला जाणाऱ्या रस्त्याला लागलो. शिळेच्या आवाजाची तीव्रता हळू हळू वाढत होती आणि इतक्यात आमचे वीर एका गावकऱ्यासोबत येताना आम्हाला दिसले व आम्ही सुटकेचा निश्वास टाकला.

पाणी संपल्यामुळे प्रदीपची बिकट अवस्था झाली होती. प्रमाणाबाहेर थकलेला प्रदीप आम्ही भेटल्यावर मटकन खालीच बसला आणि सोबत आणलेल पाणी त्याला देऊन आम्ही पण जरा वेळ विसावलो.

प्रदीप बोलायला लागल्यावर आम्हाला समजलं की तो वाट चुकून सरळ खाली गेला होता पण लक्षात आल्याने तो पुन्हा मूळ रस्त्याला लागला आणि या वेळात मी त्याला बाराटाकीच्या खळग्या पर्यन्त शोधून हिरकणवाडी गाठली होती.

परंतु प्रदीप प्रदक्षिणा संपवून काळकाई खिंडीतून बाहेर पडल्यावर उजवीकडे वळण्याऐवजी डावीकडे वळला व वाघोलीच्या दिशेने निघाला.

संध्याकाळचे ६:०० वाजत आलेले, गावातून महाडला जाणारी शेवटची एसटी निघून गेलेली, दोघांमध्ये खासगी गाडी परवडण्यासारखी नव्हती आणि महाडला पोहोचूनही रविवार असल्याने उभ्याने मुंबईपर्यन्त जाणं प्रदीपला झेपलं नसतं त्यामुळे नाईलाजस्तव आम्ही रात्र गडाखालीच काढायचं ठरवलं.

रमतगमत आम्ही तिघं पुन्हा हिरकणवाडीच्या दिशेने निघालो. जाता जाता ओळख पाळख झाली, मुंबईचे म्हणल्यावर रेवाभाऊंनी हिरा पंडित, श्याम ठोसर, नचिकेत, बाळं (वसंत) लिमये, किशोर, दिलीप झुंजारराव आणि बऱ्याच जणांची चौकशी माझ्याकडे केली. पैकी मी जेवढ्यांना ओळखत होतो त्यांची ख्याली - खुशाली कळवली.

रेवा भाऊंच्या घरी पोहोचल्यावर आम्ही हात तोंड धुवून जरा ताजेतवाने झालो. प्रदीप अतिथकव्यामुळे लगेच झोपून गेला तर मी आणि रेवा भाऊ गप्पा मारत बसलो.

किस्से सांगता सांगता गाडी त्यांचा जुना सोबती हिरा पंडित यांच्यावर आली. लिंगाणा , भवानीकडा , टकमक आदी सुळके / कडे हिरानी कसे पहिल्यांदा केले याचे रसभरीत वर्णन भाऊ सांगत होते. सह्याद्रीचा सुपुत्र श्री. संतोष गुजर ३० डिसेंबर १९७९ साली कसा काळाच्या पडद्याआड गेला आणि त्यांचे ३ दिवसांचे पार्थिव हिरा आणि भाऊंनी मिळून कसे काढले हे ऐकूनच शहारा आला.

रात्र चढत होती पण भाऊंचे किस्से संपत नव्हते, आपल्या अनुभवाची पोतडीच जणू ते माझ्यासमोर रिती करत होते. किती रात्र जागवली, कधी डोळा लागला काही समजलेच नाही !!!!!

दुसऱ्या दिवशी सकाळी भाऊंचा निरोप घेतला आणि आमच्या अगम्य प्रदक्षिणेची इतिश्री केली.

अविस्मरणीय क्षण :

- रम्य सूर्योदय.
- पायथ्यापासून पाहिलेल टकमक टोक.
- जाळीतली करवंद आणि रानमेवा.
- वाघोलीचं घनदाट जंगल.
- रेवा भाऊंचे किस्से.

प्रदक्षिणेचे धारकरी:

- संकल्प चौधरी.
- प्रदीप लाहोटी.

© Sankalp Chaudhari

समाप्त
© Sankalp Chaudhari